

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानदंनगर (बर्ली)

## ता. पलसू, जि. सांगली



मंगळवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२४

# जागर जाणीव व विवेक वाहिनी आणि मराठी विभाग आयोजित

## मराठी भाषा गौरव दिन सोहळा

### अहवाल २०२३-२४

वि. वा. शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतील महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मंगळवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. यू.व्ही.पाटील आणि उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले उपस्थित होते. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. पी.बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'जागर' भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ.दिलीप कोने, प्रा.स्वाती मगदूम व प्रा. सुनीता थोरबोले यांनी भितीपत्रक प्रकाशन कामी परिश्रम घेतले.

**निष्पत्ती :** १.कुसुमाग्रजांचा जीवनपट समजला.

२. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व अध्यापकांना मराठी भाषेचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** २७

# मराठी भाषा गौरव दिन सोहळा

## प्रतिमा पूजन व भित्तीपत्रक प्रकाशन काही क्षणचित्रे













विभागप्रमुख

प्राचार्य

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)